## MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy संदर्भात कर्मचाऱ्यांनी अवलंबिताची Online माहिती भरण्यासाठीच्या मार्गदर्शक सुचना.

*******

महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy ही दिनांक ०१.०१.२०१५ ते ३१.१२.२०१५ अशी १ वर्ष कालावधी करीता सुरु करण्यात येत आहे.

सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. ३६६१३, दिनांक १०.१२.२०१४ नुसार स्वत:ची व अवलंबिताची माहिती मानव संसाधन विभागाकडे देण्याबाबत संबंधित परिपत्रकामध्ये निर्देशीत केलेले होते. तथापि, सदर योजना Online स्वरुपात सुरु करण्याचे प्रस्तावित असल्याने कर्मचाऱ्यांनी स्वत:ची व कुटुंबियाची माहिती खालील मार्गदर्शक सुचनांचा विचार करुन नोंद करावी.

- महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी Online नोंदणी करण्याकरीता सर्व प्रथम www.mahadiscom.in या संकेत स्थळावर जावे. त्यानंतर Home Page वरील Mediclaim यावर क्लिक केल्यानंतर MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy वर क्लिक करावे. त्यानंतर महावितरण कंपनीच्या चिन्हावर क्लिक करावे. या ठिकाणी कर्मचाऱ्यांस Login Page दिसेल.
- कर्मचारी स्वतंत्रपणे वरील Login Page वर खालील URL वर क्लिक करुन देखील जावू शकेल. त्याकरीता कर्मचाऱ्यांस Web Site वर www.mdindiaonline.com/maharashtraelectricity/selection.aspx. हा Address Type करावा लागेल.
- Username म्हणून कर्मचाऱ्याने आपला CPF No. टाकावा. (उदा.CPF No-02184508 असल्यास कर्मचाऱ्याने फक्त 2184508 हा नंबर टाकावा)
- Password म्हणून कर्मचाऱ्याने आपली जन्म तारीख टाकावी. (उदा.जन्मतारीख 01.01.2015 असल्यास कर्मचाऱ्याने फक्त 01012015 (DDMMYYYY) हा टाकावा)
- Login केल्यानंतर कर्मचाऱ्यांस त्याची माहिती असलेले Webpage दिसेल. सदर माहिती कर्मचाऱ्यांनी तपासून घेवून खालील रकान्यातील माहिती भरणे बंधनकारक आहे.

  अ) **Present Address (सध्याचा पत्ता)**

  ब) **Mobile No (सध्याचा पत्ता व मोबाईल नंबर लिहिण्यासाठी कर्मचाऱ्याने नावासमोरील Edit बटनावर क्लिक करुन आपला मोबाईल नंबर व पत्ता बरोबर लिहून Update बटनावर क्लिक करावे.**

  क) **कर्मचाऱ्यांवर अवलंबून असणाऱ्या पाच सदस्यांची माहिती परिपत्रकातील कुटुंबाच्या व्याख्येच्या अधीन राहून भरण्यात यावी.**

कर्मचारी व अवलंबितांकरीता रुपये तीन लाखाचा वैद्यकीय विमा दिनांक ०१.०१.२०१५ पासून १ वर्षाकरीता म्हणजेच दिनांक ३१.१२.२०१५ पर्यंत लागू होणार आहे. तथापि, कर्मचाऱ्यांस Top Up सुविधा म्हणजेच जास्तीचा वैद्यकीय विमा करावयाचा असल्यास कर्मचाऱ्यांनी "I am interested for Top Up Policy" वर क्लिक करावे. जर कर्मचाऱ्यांस Top Up सुविधा नको असल्यास कर्मचाऱ्यांनी "I am not interested for Top Up Policy" वर किल्क करावे. कर्मचाऱ्यांना रु. १ लाख ते रु. ५ लाखापर्यंत Top Up सुविधेचा विकल्प खालीलप्रमाणे देण्यात आलेला असून कर्मचाऱ्यांनी जो विकल्प निवडला आहे त्यासमोर दर्शविण्यात आलेली वैद्यकीय विमा हप्त्याची वार्षिक रक्कम कर्मचाऱ्यांच्या जानेवारी २०१५ च्या वेतनातून एक रकमी कपात करण्यात येईल. यासाठी कर्मचाऱ्यांनी Online माहितीची Print Copy संबंधीत विभागाकडे जमा केल्यानंतरच कपात करण्यात येईल.

## फक्त कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी

| Sum Insured (Rs.) | Premium per family including tax (Family size 1+5) | | Sum Insured (Rs.) | Premium per family including tax (Family size 1+5) |
|---|---|---|---|---|
| 1 Lac | *Rs. 2896/- | | 2 Lac | *Rs. 4672/- |
| 3 Lac | *Rs. 6073/- | | 4 Lac | *Rs. 7008/- |
| 5 Lac | *Rs. 7661/- | | - | - |

* उपरोक्त Top Up सुविधेचा विकल्प तिन्ही कंपन्यांतील एकूण कर्मचाऱ्यांपैकी २५ % कर्मचाऱ्यांनी निवडला असेल तरच सदर Top Up सुविधेचा लाभ कर्मचाऱ्यांना Sum Insured समोर दर्शविलेल्या रकमेत देण्यात येईल.

- **दि. ०१.०१.२०१५ ते ३१.१२.२०१५ या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी खालीलप्रमाणे वैद्यकीय विम्याची सुविधा (Family Size 1+1) उपलब्ध करुन देण्यात येत असून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी त्याबाबतचा विकल्प सादर केल्यास त्यासमोर दर्शविण्यात आलेली रक्कम सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांस वैयक्तिकपणे भरणे गरजेचे आहे.**

| Sum Insured (Rs.) | Premium per family (Family size 1+1) | | Sum Insured (Rs.) | Premium per family (Family size 1+1) |
|---|---|---|---|---|
| 1 Lac | *Rs. 8000/- + S.T. | | 2 Lac | *Rs. 16000/-+ S.T. |
| 3 Lac | *Rs. 22000/-+ S.T. | | - | - |

* वैद्यकीय विमा सुविधेचा विकल्प तिन्ही कंपन्यांतील एकूण सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांपैकी २५ % कर्मचाऱ्यांनी निवडला असेल तरच वरील वैद्यकीय विमा सुविधेचा लाभ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना Sum Insured समोर दर्शविलेल्या रकमेत देण्यात येईल.

- कर्मचाऱ्यांनी संपूर्ण भरलेली माहिती पडताळून घेतल्यानंतर Confirm या बटनावर क्लिक करावे. तद्नंतर या माहितीमध्ये कर्मचाऱ्यांस कुठलाही बदल व्यवस्थापनाच्या मंजूरीशिवाय करता येणार नाही.
- कर्मचाऱ्यांनी उपरोक्त माहितीची Save झालेली PDF File घ्यावी तसेच त्यांची Print घेवून Top Up Facility समोर दर्शविण्यात आलेली रक्कम माझ्या माहे जानेवारी २०१५ च्या वेतनातून कपात करण्यास माझी कुठलीही हरकत नाही, अशा प्रतिज्ञापत्राखाली कर्मचाऱ्यांनी स्वत:ची स्वाक्षरी करुन एक प्रत कर्मचारी काम करीत असलेल्या संबंधीत कार्यालयास (नियंत्रण अधिकाऱ्यांकडे) सादर करावी व त्याची एक प्रत स्वत: कडे ठेवावी.